

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**विशेष शिबीर अहवाल २०२१-२२**

---

**1. महाविद्यालयाचे नाव व पत्ता :** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव जि. यवतमाळ

ता. मारेगाव जि. यवतमाळ ४४५३०३ केंद्र क्रमांक: ४२४

**2. विशेष शिबीर स्थळाचे नाव :** टाकरखेडा-डोर्ली

**3. विशेष शिबीर कालावधी :** ०३ मार्च २०२२ ते ०९ मार्च २०२२ (०७ दिवस)

**4. महाविद्यालयापासून ते शिबिरस्थळापर्यंत अंतर :** ०६ कि.मी

**5. शिबिरात सहभागी रा.से.यो स्वयंसेवक संख्या :** ७५

मा. संचालक रा.से.यो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, यांचे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर बाबत मार्गदर्शन करणारे पत्रानुसार (संदर्भ: संगाबाअवि /रासेयो/१७/१९२/२०२२ दिं. ०९ फेब्रु २०२२) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मारेगाव येथे दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ रोजी रासेयो कार्यक्रम व सहकार्यक्रम अधिकारी यांची सभा आयोजित करण्यात आली. सदर सभेत प्राचार्य डॉ. अविनाश घरडे सर यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष श्रम संस्कार शिबिराची रूपरेषा निश्चित करण्यात आली.

**आगमन दिवस (०२ मार्च २०२२)**

दुपारी १२:०० वाजता शिबीर स्थळी रासेयो स्वयंसेवकांचे आगमन झाले. स्वयंसेवकाचे १२ ग्रुप मध्ये विभागणी करून राहण्याची व्यवस्था व शिबीर स्थळाची स्वछता करण्यात आली. तसेच गावकऱ्यांबरोबर संवाद व उद्घाटन संबंधित चर्चा करण्यात आली.

**दिवस पहिला (०३ मार्च २०२२)**

दुपारी १२:३० वाजता शेतकरी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. नानाजी पाटील खंडाळकर यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. उद्घाटन समारंभाला अध्यक्ष म्हणून शेतकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. जीवन पाटील कापसे व प्रमुख उपस्थिती म्हणून टाकरखेडा या गावचे सरपंच डॉ. रामदास नगराळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश घरडे, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवर आपले विचार व्यक्त करत असताना गावची स्वछता, आरोग्य, शिक्षण, समाजसेवा, अंधश्रद्धा आदी विषयावर गावकरी व विद्यार्थ्यां यांना उदभोदन केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विजय भगत, प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब देशमुख व आभार प्रा. माधुरी शेंडे यांनी केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधला आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

७.०० ते ८.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी भोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली.

८.०० ते १०.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यानंतर गटप्रमुखाशी चर्चा करून कार्यक्रम अधिकाऱ्यांनी पुढील दिवसाचे नियोजन केले.

**दिवस दुसरा (०४ मार्च २०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून श्रमदानासाठी प्रस्थान केले. सकाळच्या पहिल्या सत्रात ८.३० ते १२.३० पर्यंत श्रमदानाच्या माध्यमातून टाकरखेडा गावातील नाले साफसफाईचे कामे केली सोबतच सांडपाण्याच्या शेजारचे तण व कचरा काढून स्वछता करण्यास सुरुवात केली. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून पुढील कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० या कालावधीत बौद्धिक उपक्रमांतर्गत 'आपत्ती व्यवस्थापन, स्पर्धा परीक्षा आणि व्यसनमुक्ती' या विषयावर प्रा. डॉ. राजेश चवरे, प्रा. डॉ. प्रवीण कुलकर्णी व प्रा. राम ठमके यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून पुढील दिवशी घेण्यात येणाऱ्या कोविड लसीकरणाविषयी माहिती गावकऱ्यांना सांगण्यात आली आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

७.०० ते ८.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी भोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली.

८.०० ते १०.०० या कालावधीत आमच्या महाविद्यालयातील श्री. अभिजित पंढरपुरे व आकाश कुमरे यांनी लोकगीते व महापुरुषांच्या जीवनावर वर आधारीत सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. यानंतर गटप्रमुखाशी चर्चा करून कार्यक्रम अधिकाऱ्यांनी पुढील दिवसाचे नियोजन केले.

**तिसरा दिवस (०५ मार्च २०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून श्रमदानासाठी प्रस्थान केले. सकाळच्या पहिल्या सत्रात ८.३० ते १२.३० पर्यंत श्रमदानाच्या माध्यमातून टाकरखेडा येथील रस्ते साफसफाई, गाजर गवत निर्मूलन आदी कामे

करून ग्रामस्वच्छता करण्यात आली. यामध्ये चार ग्रुपने सहभाग घेतला. उर्वरित एका ग्रुपने लसीकरणाचे कामे केली. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून पुढील कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० या कालावधीत बौद्धिक कार्यक्रमात 'संविधानाची मूल्ये व मतदान जनजागृती' या विषयावर प्रा. जी. बी. माघाडे, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी मार्गदर्शनात भारतीय संविधानाची भारताच्या लोकशाही शासन पद्धतीचा विकासातील भूमिका तसेच प्रा. डॉ. सुधीर चिरडे व प्रा. अक्षय जेनेकर यांनी मतदानाचे अधिकार या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य विभाग, मारेगाव येथील आरोग्य अधिकारी डॉ. वेले मॅडम यांनी कोरोना व सिकलसेल संदर्भात मार्गदर्शन केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून पुढील दिवशी घेणाऱ्या आरोग्य तपासणीची माहिती गावकऱ्यांना सांगण्यात आली आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

७.०० ते ८.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी भोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली.

८.०० ते १०.०० या कालावधीत गुरुदेव सेवा भजनी मंडळ वेगाव यांचे समाज प्रबोधनपर भजने सादर करण्यात आले व आमच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. हेमंत चौधरी यांचा 'हसा आणि निरोगी जगा' यावर हास्य कार्यक्रम सादर केला..

**चौथा दिवस (०६ मार्च २०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून श्रमदानासाठी प्रस्थान केले. सकाळच्या पहिल्या सत्रात ८.३० ते १२.३० पर्यंत गावकऱ्यांसाठी आरोग्य शिबीर राबविण्यात आले. यामध्ये स्त्रीरोग तज्ञ डॉ. सपना केळोदे व जनरल फिजिशियन डॉ. अक्षय खंडाळकर यांनी गावकऱ्यांची तपासणी केली. यामध्ये ४० गावकऱ्यांनी सहभाग घेतला. शिबिरात स्वयंसेवकाच्या एका ग्रुपने मदत केली. उर्वरित चार ग्रुपने श्रमदानाच्या माध्यमातून गटग्रामपंचायत डोर्ली येथे नाले साफसफाई, रस्ते दुरुस्ती, गाजर गवत व तण निर्मूलन, सार्वजनिक मंदिराच्या अवतीभोवतीचे स्वच्छता करण्यात आली. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून पुढील कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० या कालावधीत बौद्धिक कार्यक्रमात 'महिला सक्षमीकरण व सकारात्मक विचार' या विषयावर सामाजिक कार्यकर्त्या सौ. किरणताई देरकर या बोलत असताना महिलांच्या मनातील न्यूनगंड दूर झाल्याशिवाय महिला शक्तीचा विकास होणार नाही तर प्रा. डॉ. माधुरी तानूरकर यांनी सकारात्मक विचार यावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून गावकऱ्यांशी संवाद साधून गावाच्या विविध समस्या जाणून घेतल्या आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

७.०० ते ८.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी भोजन करून सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी केली.

८.०० ते १०.०० या कालावधीत प्रा. डॉ. गजानन सोडणर यांनी रशिया-युक्रेन यांच्यामध्ये चाललेल्या युद्धाची कारणे व त्यामुळे होणारे जागतिक परिणाम यावर गावकऱ्यांना जिवंत विषयावर मार्गदर्शन करण्यात आले व विद्यार्थ्यांची गीतगायन अंताक्षरी घेण्यात आली.

**पाचवा दिवस (०७ मार्च २०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून श्रमदानासाठी प्रस्थान केले. सकाळच्या पहिल्या सत्रात ८.३० ते १२.३० पर्यंत श्रमदानाच्या माध्यमातून टाकरखेडा येथील ग्रामपंचायतीची मोकळ्या असलेल्या जागेमधील काटेरी झुडपे, सांडपाण्याचे नियोजन, अतिक्रमणात असलेले उकिर्डे इत्यादी कामाच्या माध्यमातून स्वछता करण्यात आली. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून पुढील कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० या कालावधीत बौद्धिक कार्यक्रमात 'पोषण आहार व अंधश्रद्धा निर्मूलन' या विषयावर प्रा. डॉ. श्रीराम खाडे आपले विचार मांडत असताना अंधश्रद्धेच्या माध्यमातून समाजावर होणारे विपरीत परिणाम, तर डॉ. विभा घोडखांदे व डॉ. मीनाक्षी कांबळे यांनी बदलेल्या जीवनशैलीत आहाराचे नियोजन कसे असावे या संदर्भात मान्यवरांनी स्वयंसेवकास मार्गदर्शन केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून महिला दिनानिमित्य राबविण्यात येणाऱ्या रक्तदान शिबीर व पशुचिकीत्सा शिबीर याविषयी गावामध्ये जनजागृती करण्यात आली आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

८.०० ते १०.०० या कालावधीत स्वरधारा संगीत रजनी ग्रुप, मारेगाव यांच्यामाध्यमातून गायक नागेश रायपुरे व संच यांनी विविध गीते गाऊन गावकऱ्यांचे मनोरंजन केले.

**सहावा दिवस (०८/०३/२०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून त्यातल्या एका ग्रुपने पशुचिकित्सा शिबिराचे नियोजन करून शिबीर व्यवस्थित पार पडले. यावेळी पशु डॉ. सुरज देवगडे यांनी सहकार्य केले. उर्वरित ग्रुपने गावातील रस्तावर व दुकाने आणि मंदिरा भोवतालची समूळ प्लास्टिक गोळा करून नष्ट करण्यात आले. त्यानंतर रक्तदान शिबिराचे व्यवस्थापन करून १८ स्वयंसेवकांनी रक्तदान शिबिरात भाग घेऊन रक्तदान केले. एकूण २७ बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून पुढील कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारच्या सत्रात २.०० ते ५.०० या कालावधीत बौद्धिक कार्यक्रमात बौद्धिक कार्यक्रमात 'वृक्ष संवर्धन व पर्यावरण जनजागृती' या विषयावर प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी मानवाकडून होत असलेल्या जंगलतोडीमुळे वातावरणात होणारे बदल या विषयी मार्गदर्शन केले. तर प्रा. शैलेश कांबळे, प्रा. डॉ. अनिल अडसरे व प्रा. प्रदीप माकडे यांनी बदललेल्या वातावरणामुळे हवामानात होणारे बदल, अवकाळी पावसाची कारणे, व समुद्राच्या पाणी पातळीमध्ये होणारी वाढ यावर स्वयंसेवकास मार्गदर्शन केले.

५.३० ते ७.०० या कालावधीत स्वयंसेवकांनी शिवार फेरीच्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्य यांच्याकडे जाऊन पुढील दिवशी होणाऱ्या शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाची रूपरेषा समजावून सांगण्यात आले आणि सायंकाळची प्रार्थना व स्फुर्तीगीते गायली.

८.०० ते १०.०० या कालावधीत श्री. संदीप गोहोकर यांनी 'छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य व आजचा महाराष्ट्र' यावर आपले मार्गदर्शन गावकऱ्यांसमोर व्यक्त केले. तसेच प्रा. विजय भगत व स्वयंसेवकांनी मराठी वऱ्हाडी कविता, नाटके, 'बेटी बचाव बेटी पढाव, या विषयावर आपली कलाकृती सादर करून गावातील लोकांमध्ये एक चांगला संदेश पोहंचविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**सातवा दिवस (०९/०३/२०२२)**

पहाटे ५.०० वाजता सुप्रभात, सकाळी ६. ०० ते ७.३०. या कालावधीत स्वयंसेवकांनी व्यायाम व योगासने, प्रार्थना, रासेयो गीते सादर केली.

८.०० ते ८.३० या वेळेत स्वयंसेवकांनी अल्पोपहार करून पहिल्या सत्रात गावात रॅली व पथनाट्य याच्या माध्यमातून टाकरखेडा गावात व्यसनमुक्ती व जलसंवर्धन आदी विषयावर जनजागृती करण्यात आली. १२.३० ते २.०० या वेळेत वैयक्तिक स्वछता व भोजन करून समारोपीय कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

०२:३० वाजता समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश घरडे सर उपस्थित होते. तर अतिथी म्हणून जिल्हा परिषद सदस्य सौ. अरुणाताई खंडाळकर, मारेगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष डॉ. मनीष मस्की, मुख्यध्यापक चिकटे सर, माजी मुख्याध्यापक वऱ्हाटे सर उपसरपंच वैष्णवीताई शेंडे आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. यादरम्यान गावासाठी केलेल्या कामाची पावती म्हणून गावकऱ्यांकडून प्राचार्य, कार्यक्रम अधिकारी आणि सहकार्यक्रम अधिकारी यांच्या शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. तसेच गावातील

प्रतिष्टित नागरिक मुख्याध्यापक चिकटे सर व माजी मुख्याध्यापक वऱ्हाटे सर यांनी स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक केले आणि टाकरखेडा या गावची निवड केल्याबद्दल आभार व्यक्त केले तर उपसरपंच शेंडे मॅडम यांनी पुढील वर्षी टाकरखेडा-डोर्ली या गावी रासेयो च्या शिबिराचे निमंत्रण दिले. मा. सौ. अरुणाताई खंडाळकर व डॉ. मस्की यांनी समाजसेवेतून देशसेवा करण्याचे कार्य म्हणजे रासेयो आहे हे पटवून सांगण्याचा प्रयत्न केला. मा. प्राचार्य डॉ. अविनाश घरडे सरानी आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलत असताना स्वच्छता अभियान राबविल्यामुळे मा. पंतप्रधान यांच्या राष्ट्रीय पातळीवरील स्वछता अभियानात खारीचा वाट उचलला आहे. तर यापुढेही स्वयंसेवकांनी राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन राष्ट्र निर्माण मध्ये मदत करण्याचे आव्हान केले. यानंतर रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी रासेयो शिबिरात सहकार्य केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहल भांदककर मॅडम यांनी केले.

रासेयो शिबीर यशस्वी होण्यासाठी खास करून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश घरडे सर, श्री. रवी धानोरकर सर व क्रीडा विभागाचे प्रा. डॉ. नितेश राऊत सरानी नियमित योगा घेऊन सहकार्य केले. तसेच प्रा. डॉ. गजानन सोडणर, प्रा. डॉ. प्रवीण कुलकर्णी, प्रा. डॉ. विनोद चव्हाण, प्रा. शैलेश आत्राम, सामाजिक कार्यकर्ते संजय जिवने, मारेगावातील पत्रकार बांधव, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षेकत्तर कर्मचारी, रासेयो विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी परिश्रम घेतले.